## अर्जदारचा उलटतपास सामनेवालेतर्फे विधीज्ञ श्री. जी. डी. खपके यांचे मार्फत:–

१. सामनेवाला हा सध्या त्यांचे आई–वडील यांच्यासोबत राहतो. सामनेवालांच्या वडीलांची बायपास सर्जरी झाली आहे तसेच त्यांना कर्करोग आहे, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मूळ अर्ज हा एकतर्फा झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वसुलीचा अर्जदेखील दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हे नियमीतपणे पोटगीची रक्कम देतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे सन २०१७ ते २०१९ सालाच्या दरम्यान व आजच्या परीस्थितीमध्ये खूप मोठा बदल झाला आहे, हे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाले यांच्या उत्पन्नाचा पुरावा मी दाखल केलेला नाही. मी सतत आजारी असते याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. मी टाकळीमियाँ येथील मातोश्री हॉस्पीटल येथे उपचार घेत आहे. त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र मी दाखल करण्यास तयार आहे. मला दरमहिना वैद्यकीय उपचारासाठी १,५००/– ते २,०००/– रूपये लागतात. मी सन २०१९ पासून मला वैद्यकीय उपचार घ्यावे लागतात, याबाबत कागदपत्र दाखल करण्यास तयार आहे.

२. सामनेवाला हा नोकरी करतो याबाबत मी कुठलाही दस्तऐवज दाखल केलेला नाही. सामनेवाला याच्या पगारात २०१७ ते २०२३ या काळात वाढ झाली आहे. तसेच त्याने काही रक्कम बँकेत ठेव स्वरूपात ठेवलेली आहे, याबाबत मी कागदपत्रे दाखल केले नाही व त्याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. सामनेवाला याच्या स्थावर व जंगम मालमत्तेमध्ये वाढ झालेली आहे याबबात मी कागदपत्रे दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवालाच्या उत्पन्नाबाबत मी खोटी कथने केली आहे.

३. माझे शिक्षण १०वी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शिक्षणानुसार दरमहा १० ते १५ हजार रूपये उत्पन्न असलेली नोकरी मला मिळू शकते. हे म्हणणे खरे नाही की, मला वाढीव पोटगीची कुठलीही आवश्यकता नाही. मी प्रस्तुतचा वाढीव पोटगीपोटी खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला विरूद्ध वाढीव पोटगी मिळावी म्हणून प्रत्यक्ष व फोनद्वारे संपर्क केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला यांस केवळ शारिरीक व मानसिक त्रास

व्हावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.03.10 11:03:19 +0530

राहुरी
दिनांकः ०९/०३/२०२६

**(पी.एच.पाटील)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, राहुरी